| | |
|---|---|
| MHKO120003502024 | **संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१३२/२०२४**<br>महाराष्ट्र शासन<br>वि.<br>**प्रदिप दादासो देशपांडे** |

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या १९७४ चा अधिनियम दोन प्रकरण एकवीस संक्षिप्त संपरीक्षा केलेल्या खटल्याचा अभिलेख

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, गारगोटी यांचे न्यायालयात**

१. गुन्हा घडल्याची तारीख – १३/१२/२०२३

२. फिर्याद दाखल तारीख – १३/१२/२०२३

३. फियादीचे नांव व पत्ता – जयवंत कृष्णा ढोकरे, पो.ना.२०६६
भुदरगड पोलिस ठाणे

४. आरोपीचे नांव व पत्ता – **प्रदिप दादासो देशपांडे**
व.व.३७,
रा. इस्पुर्ली, ता. करवीर, जि. कोल्हापूर

५. आरोपीत गुन्हा – भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २८३ प्रमाणे

दि.१३/१२/२०२३ रोजी ०४.३० वाजणेचे सुमारास अन्नपूर्णा भोजनालयासमोर, गारगोटी, ता. भुदरगड येथे तुम्ही आपले ताबेतील टेम्पो क्र. एम. एच. ०९ एफ. एल. ७३२७ हे रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन येणा–या जाणा–या लोकांना व वाहनांना वाहतुकीस अडथळा होईल अशा पध्दतीने धोकादायकरित्या उभे केले आणि तुम्ही भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २८३ अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला आहे असा तुमचेवर आरोप आहे.

६. आरोपीचा जबाब –

प्रश्न क्र.१ – तुम्हाला फिर्याद ची प्रत मिळाली का ?

उत्तर – होय.

प्रश्न क्र.२ – तुम्हाला आरोप वाचून दाखविण्यात आले ते समजले का ?

उत्तर – होय.

प्रश्न क्र.३ – तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर – मला गुन्हा कबुल आहे.

दिनांक – १६/०३/२०२६ समक्ष,

Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE Date: 2026.03.17 11:12:12 +0530

NISHANT DIPAK RUDRABHATE

––––––– (नि. दि. रुद्रभटे)

आरोपीची सही प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, गारगोटी

आरोपीने स्वतः अर्ज देवुन भारतीय दंड संहिता कलम २८३ प्रमाणे गुन्हा केल्याचे कबूल केले आहे. आरोपीचे म्हणणे ऐकले. आरोपीला सुचविण्यात आले की, तो त्याचे बचावाला त्याचे पसंतीचे वकील अथवा विधि सेवा समितीद्वारे नेमलेले वकील देऊ शकतो, परंतु, आरोपीने त्याला बचावासाठी वकील देण्याचा नाही व स्वतःहून त्याला गुन्हा कबुल असल्याचे त्याने सांगितले. आरोपीला समन्सची बजावणी झालेली आहे व आरोपीने त्याचे ओळखपत्राची छायांकित प्रत देखील सोबत जोडली आहे. यावरून हजर झालेली व्यक्ती ही आरोपीच आहे. सदरचा गुन्हा हा आरोपीचे हातुन पहिल्यांदाच घडलेला असून त्याने कमीत कमी शिक्षा व्हावी अशी विनंती केली आहे. सबब, गुन्हयाचे स्वरुप तसेच आरोपीचे कबूलीचे कथन व आरोपीची आर्थिक परिस्थिती यांचा विचार करता न्यायाचे कारणास्तव मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) आरोपी – **प्रदिप दादासो देशपांडे** यास फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये भारतीय दंड संहिता कलम २८३ अंतर्गत दोषी ठरविणेत येत आहे.

२) आरोपीला भारतीय दंड संहिता कलम २८३ या गुन्हयासाठी रक्कम रु.२००/– (रु.दोनशे) द्रव्यदंड ठोठावण्यात येत आहे. दंड न भरलेस आरोपीला १ (एक) दिवसाची साधी कैद सुनावणेत येत आहे.

Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE Date: 2026.03.17 11:12:16 +0530

NISHANT DIPAK RUDRABHATE

(नि. दि. रुद्रभटे)

दिनांक – १६/०३/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, गारगोटी